

# लिंग समभाव आणि महिला सक्षमीकरण


मुख्य संपादक

प्राचार्य डॉ. अशोक खैरनार

संपादक

प्रा. कांतीलाल सोनवणे

प्रा. अतिष मेश्राम

डॉ. प्रियंका सुलाखे




Scanned with OKEN Scanner

## – अनुक्रम –


- **स्त्री–पुरूष समानतेसाठी स्त्री सबलीकरण : एक चिकित्सा** ..... १९
  – प्रा.ए.बी. महाजन
- **अक्कलकुवा तालुक्यातील ग्रामिण भागात........................ २७**
  **पुरूष व महिला विषमतेचे भौगोलिक अध्ययन**
  – प्रा.एम.एल. सावंत
- **जीवनोन्नती अभियानाच्या माध्यमातून** ........................ ३३
  **ग्रामिण महिलांचे सक्षमीकरण**
  – प्रा.डॉ. अरुण उखा पाटील
- **राष्ट्रीय विकास आणि महिला सशक्तीकरण** .................. ३७
  **(मानवी हक्काच्या दृष्टिकोनातून)**
  – प्रा. दिलीप हरसिंग राठोड
- **भारतातील महिलांचे स्थान** .................................. ४१
  – प्रा. वळवी उर्मिला गणेश
- **'अधांतर' या नाटकातील स्त्री प्रतिमा**........................ ४९
  – प्रा. भैय्या दिलीप पाटील
- **साहित्य व सांस्कृतिक क्षेत्रातील महिलांचे योगदान**.......... ५५
  **: सशक्तीकरणाचा नवा दृष्टिकोन**
  – प्रा.डॉ. दिलीपसिंह श. निकुंभ
- **भारतीय महिलांचे घटनात्मक आणि**........................... ६१
  **कायदेशीर अधिकार व आजची स्थिती**
  – प्रा. दिलीप हरसिंग राठोड
  – श्रीमती वैशाली गुलाबराव सावंत
- **भारतातील स्त्रियांची सामाजिक स्थिती** ...................... ६५
  – डॉ. विश्रांती ग. मुंजेवार
- **महिला शिक्षकांमध्ये संविधानात्मक आणि**.................... ७४
  **कायदेशीर अधिकारांच्या जाणीवेचा अभ्यास करणे**
  – डॉ. कविता साळुंके
  – कु. ज्योती लष्करी




Scanned with OKEN Scanner

# जीवनोन्नती अभियानाच्या माध्यमातून ग्रामिण महिलांचे सक्षमीकरण

– प्रा.डॉ. अरुण उखा पाटील
अर्थशास्त्र विभाग, कला व वाणिज्य महाविद्यालय, अक्कलकुवा, जि. नंदुरबार

**प्रस्तावना**

स्वातंत्र्यपूर्व काळात भारतात दारिद्र्य होतेच. परंतु भारताला स्वातंत्र्य मिळाले त्यावेळी सुद्धा भारताच्या विशेष करून ग्रामिण भागामध्ये कमालीचे दारिद्र्य होते. अशा स्थितीत जनतेची आर्थिक परिस्थिती सुधारण्याच्या दृष्टीने ग्रामिण भागात त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, शेती व्यवसायाच्या स्थितीत सुधारणा करणे, ग्रामीण भागामध्ये पायाभूत सुविधांची उपलब्धता करून देणे व जनतेला स्वावलंबी बनविण्याच्या उद्देशाने ग्रामिण दारिद्र्य निर्मुलनाकरिता स्वातंत्र्य मिळाल्यानंतर विविध योजना सुरू करण्यात आल्या. सदर योजनांच्या माध्यमातून ग्रामिण महिलांच्या सक्षमीकरणात कशी भर पडेल या उद्देशाने सदर संशोधन पेपर तयार करण्याचे ठरविण्यात आले.

**अध्ययनाची उद्दिष्ट्ये –** १) स्त्रियांच्या सक्षमीकरणात शासनाची भूमिका अभ्यासणे. २) महिलांसाठी शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा अभ्यास करणे. ३) जीवनोन्नती अभियानाच्या माध्यमातून ग्रामिण महिला सक्षमीकरणात झालेले बदल अभ्यासणे.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत अध्ययनासाठी महिलांच्या सक्षमीकरणात जीवनोन्नती अभियानाचे महत्त्व लक्षात घेऊन जीवनोन्नती अभियानामध्ये शासनाच्या विविध योजना व महिला स्वयंसहाय्यता बचत गटांच्या अभ्यासासाठी प्राथमिक व दुय्यम साधन सामुग्रीचा वापर करण्यात आला आहे.

**शासनाच्या विविध योजना**

ग्रामीण भागामध्ये पायाभूत सुविधा उपलब्ध करून देऊन उद्योगांची वाढ करणे व जनतेला स्वावलंबी बनविणे याची जाणीव लक्षात घेऊन दारिद्र्य निर्मुलनाकरीता रोजगार निर्माण व शेती सुधारणेच्या दृष्टीकोनातून समुदाय विकास कार्यक्रम (१९५२), ग्रामिण आवास योजना (१९५७), गहण कृषी क्षेत्र कार्यक्रम (१९६०), पत अधिकृतता योजना (१९६५), रोजगार हमीयोजना (१९६९), एकात्मिक ग्रामिण विकास कार्यक्रम (१९८०) अशा विविध योजनांची आखणी करून शासनाने अंमलबजावणीसुरू केली. दुर्दैवाने अशा योजनांना अपेक्षित यश



Scanned with OKEN Scanner

आले नाही. तेव्हा शासनाकडून राबविल्या जाणाऱ्या विविध योजनांचा आढावा घेण्यासाठी१९९७ ला प्रा.एस.आर. हाशीम यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली. या समितीने सन १९९९ ला अहवाल सादर केला.

समितीने आपल्या अहवालात व्यक्तीगत अनुदान व लाभ मिळवून देणाऱ्या योजनांऐवजी सामुहिक विकासाला प्राधान्य देऊन ग्रामिण भागामध्ये विशेषत: महिलांचा समुह स्थापन करून अशा समुहांना अनुदान व रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याची शिफारस केली. तत्कालीन पंतप्रधान अटल बिहारी वाजपेई यांनी या शिफारशींवरून ग्रामिण विकास मंत्रालयाअंतर्गत एकात्मिक ग्रामिण विकास कार्यक्रम-१९८०, ग्रामिण युवक रोजगार प्रशिक्षण योजना-१९७९, ग्रामिण महिला व बालविकास कार्यक्रम-१९८२, ग्रामिण कारागिरांना आधुनिक अवजारांचा पुरवठा-१९९२, गंगा कल्याण योजना - १९९७ आणि दशलक्ष विहीर योजना-१९८८ या सहा योजना एकत्र करून स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजना - मार्च १९९९ पासून सुरू करण्याचा निर्णय घेतला आणि एप्रिल १९९९ पासून ग्रामिण भागात स्वयंसहाय्यता गट स्थापून लघु उपक्रमांच्या माध्यमातून शाश्वत रोजगार निर्मितीकरीता वित्त, तंत्रज्ञान, विपणन व पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याकरीता सदर योजना सुरू केली.

मार्च १९९९ पासून मार्च २०११ पर्यंत महाराष्ट्रात या योजनेअंतर्गत २,५४,६७३ स्वयं सहाय्यता गट स्थापन केले गेले. त्यातील ८०,८४२ म्हणजे ३१.७४ टक्के गटांनी उपक्रम सुरू केले. या एकूण गटांपैकी २,०१,८१७ म्हणजे ७१.२४ टक्के गट महिलांचे असून त्यातील ७१,७१३ महिला गटांनी व्यवसाय सुरू केले.

स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजनेच्या माध्यमातून महाराष्ट्रातील सुमारे २,७०,००० ग्रामिण कुटुंबे ही दारिद्र्य रेषेच्या वर आली. या योजनेच्या अंमलबजावणीमुळे ग्रामिण दारिद्र्यात घट होऊन कौशल्य व उद्योगधंद्यांमध्ये विकास होत होता. असे असले तरीही दारिद्र्य निर्मुलनाचे उद्दिष्ट पूर्ण होऊ शकले नव्हते. भारतातील ७.५ कोटी दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांपैकी अजूनही ४.५ कोटी कुटुंबे या योजनेपासून दूर होते. तर महाराष्ट्रातील ५६,००० ग्रामिण कुटुंबांना या योजनेत समाविष्ट करण्याचे बाकी होते. या संदर्भात पतविषयक बाबींचा अभ्यास करण्यासाठी भारत सरकारच्या ग्रामीण विकास मंत्रालयाने एप्रिल २००८ मध्ये प्रा. रामकृष्ण समिती स्थापन केली.

सदर समितीने स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजनेत बदल सुचवून सदर योजनेची पुर्नबांधणी करून 'राष्ट्रीय ग्रामिण जीवनोन्नती अभियान' राबवण्याची शिफारस केली. जुलै २०११ पासून सदर अभियानांतर्गत दारिद्र्य रेषेखालील



कुटुंबातील महिलांचा स्वयंसहाय्यता गट स्थापन करून महिलांच्या पुढाकाराने सर्व परिवाराला शाश्वत रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या जात आहेत.

राष्ट्रीय ग्रामिण जीवनोन्नती अभियान ही केंद्रीय योजना असून दिल्ली व चंदीगढ वगळता सर्व राज्ये व केंद्रशासित प्रदेशात हे अभियान राबविले जात आहे. अंतर्गत असलेले अकार्यक्षम व बंद पडलेल्या स्वयंसहाय्यता गटांची माहिती घेऊन त्यांची पुनर्बांधणी करण्याचे काम चालू आहे. हे अभियान देश पातळीवरील ६०० जिल्ह्यातील ६००० ब्लॉकमधील २.५ लाख ग्रामपंचायतीतील ६ लाख गावातील ७ कोटी दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांपर्यंत पोहचवून त्यांना १० वर्षात दारिद्र्यातून बाहेर काढण्याकरिता विविध सुविधा व सहाय्य उपलब्ध करून देण्याकरीता सदर अभियान कटिबद्ध आहे.

भारतातील एकूण दारिद्र्य रेषेखालील लोकांपैकी जवळपास ९०% लोक ज्या तेरा राज्यात राहतात अशा १३ घटक राज्यांमधील (आसाम, बिहार, छत्तीसगढ, झारखंड, उत्तरप्रदेश, गुजरात, महाराष्ट्र, मध्यप्रदेश, ओरिसा, राजस्थान, पं. बंगाल, कर्नाटक, तामिळनाडू) १०७ जिल्ह्यातील ४२२ ब्लॉक मध्ये राष्ट्रीय ग्रामिण आजीविका प्रकल्प राबविला जात आहे.

महाराष्ट्र शासनाने राज्याचा विस्तार पाहता हे अभियान इंटेन्सिव व नॉन इंटेन्सिव अशा दोन टप्प्यात राबविण्याचा निर्णय घेतला आहे. इंटेन्सिव जिल्ह्यांमध्ये ठाणे, रत्नागिरी, नंदुरबार, जालना, सोलापूर, उस्मानाबाद, वर्धा, यवतमाळ, गडचिरोली व गोंदिया या १० जिल्ह्यांचा समावेश आहे. तर मुंबई शहर व उपनगर वगळता उर्वरित जिल्ह्यांमध्ये नॉन इंटेन्सिव पद्धतीने सदर अभियान राबविण्यात येत आहे.

**जीवनोन्नती अभियानाची भूमिका व कार्ये** - १) गाव पातळीवर प्रत्येकी १० ते २० सदस्यांचा स्वयं सहाय्यता गट स्थापन करून सदर गटाचे बळकटीकरण व गटाच्या सदस्यांच्या उन्नतीकरीता सर्वतोपरी मदत करण्यात येते. २) प्रत्येक स्वयंसहाय्यता गटाचे नेतृत्व करण्याकरिता एका प्रभावशाली महिलेची संसाधान व्यक्ती म्हणून व एका महिलेची लेखापाल म्हणून निवड केली जाते व आवश्यकतेनुसार त्यांना प्रशिक्षण दिले जाते. ३) स्वयंसहाय्यता गटाच्या सदस्यांना स्वयंरोजगार सुरू करण्याकरिता व्यवस्थापकीय व कौशल्य विषयक प्रशिक्षण दिले जाते. यात गटाची नोंदणी, रोजगार निश्चिती, उद्योगाची निवड, बाजाराचे ज्ञान, विपणन इ. चा समावेश होतो. ४) सदर गटाच्या माध्यमातून उत्पादीत वस्तुंचे तालुका व जिल्हा स्तरावर प्रदर्शन भरविण्यात येते. तसेच गटाच्या सदस्यांना इतर विविध गटांच्या कार्यांचे अवलोकन करण्याकरिता क्षेत्र भेटीचे आयोजन केले जाते. ५) गटाच्या तात्काळ आर्थिक गरजा भागविण्यासाठी

फिरता निधी उपलब्ध करून दिला जातो. ६) गटाच्या सदस्यांना प्रशिक्षण चांगले देता यावे यासाठी प्रशिक्षक्षण संस्था, अभियांत्रिकी महाविद्यालय, नर्सिंग महाविद्यालय, कृषी विज्ञान केंद्र, शेतकी महाविद्यालये यांची मदत घेतली जाते. ७) गटांना आवश्यकतेनुसार भांडवली अनुदान व पतपुरवठा केला जातो. ८) स्वयंसहाय्यता गटांना घेतलेले कर्ज परवडावे म्हणून घेतलेल्या कर्जावर अनुदानाची तरतुद केली जाते. वार्षिक ४% दराने कर्जपुरवठा केला जातो. ९) कार्यरत असलेल्या स्वयंसहाय्यता गटांचे नियमित बैठका, नियमित बचत, अंतर्गत कर्जाचे वाटप, नियमित कर्जाची परतफेड, लेखापुस्तके अद्ययावत ठेवणे यापंचसुत्रीच्या आधारावर गटाचे मूल्यमापन केले जाते.

अशा प्रकारे महाराष्ट्रात ग्रामिण जीवनोन्नती अभियान प्रभावीपणे राबविले जात आहे. सन २०१२-१३ मध्ये महाराष्ट्रात एकूण ५६७७ स्वयंसहाय्यता गटांची स्थापना करण्यात आली. ज्यामध्ये एकूण ६०,८०१ स्वयंरोजगारी सदस्यांचा समावेश होता. यास्वयंरोजगारींना सन २०१२-१३ मध्ये ७२.१९ को.रू. अनुदान व २०७.९९ को.रू. कर्ज पुरविण्यात आले. सन २०१३-१४ ला एकूण ९०२४ स्वयंसहाय्यता गटांची स्थापना केली गेली. ज्यामध्ये एकूण १,०२,७८९ स्वयंरोजगारी समाविष्ट होते व त्यांना एकूण ४०५.६९ कोटी रू. कर्ज उपलब्ध करून दिले गेले. तर इ.स. २०१४-१५ वर्ष अखेर ४६,०४८ स्वयंसहाय्यतागटांची स्थापना झाली. ज्यामध्ये एकूण १२,७१,८०८ सदस्य होते. या सर्व स्वयंरोजगारींना ५३.६९ को.रू. अनुदान व ५२७.७८ को.रू. पतपुरवठा केला गेला.

सन २०१५-१६ मध्ये डिसेंबर अखेर ८२,८१७ स्वयंसहाय्यता गटांची स्थापना झाली. त्यात १५,७३,५६७ सदस्य होते. त्यांना १४.९१ को.रू. अनुदान व २९४.४५ को.रू. इतका कर्जपुरवठा केला गेला.

## संदर्भसूची


१. मुलाणी एम.यु., 'महिला स्वयं सहाय्यता बचतगट', प्रथमावृत्ती २०१२, डायमंड पब्लीकेशन, पुणे.

२. 'राष्ट्रीय ग्रामिण आजीविका मिशन (कार्यान्वयन का स्वरूप)', २०१३, ग्रामिण विकास मंत्रालय, भारत सरकार, नई दिल्ली.

३. नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन - 'महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०१४-१५' अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई.

४. 'अर्थसंवाद' - मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक, ऑक्टोबर-डिसेंबर २०१६, खंड ४०, अंक ३.

५. विविध संकेतस्थळे व दैनिक वर्तमानपत्रे




Scanned with OKEN Scanner

फिरता निधी उपलब्ध करून दिला जातो. ६) गटाच्या सदस्यांना प्रशिक्षण चांगले देता यावे यासाठी प्रशिक्षक्षण संस्था, अभियांत्रिकी महाविद्यालय, नर्सिंग महाविद्यालय, कृषी विज्ञान केंद्र, शेतकी महाविद्यालये यांची मदत घेतली जाते. ७) गटांना आवश्यकतेनुसार भांडवली अनुदान व पतपुरवठा केला जातो. ८) स्वयंसहाय्यता गटांना घेतलेले कर्ज परवडावे म्हणून घेतलेल्या कर्जावर अनुदानाची तरतुद केली जाते. वार्षिक ४% दराने कर्जपुरवठा केला जातो. ९) कार्यरत असलेल्या स्वयंसहाय्यता गटांचे नियमित बैठका, नियमित बचत, अंतर्गत कर्जाचे वाटप, नियमित कर्जाची परतफेड, लेखापुस्तके अद्ययावत ठेवणे यापंचसुत्रीच्या आधारावर गटाचे मूल्यमापन केले जाते.

अशा प्रकारे महाराष्ट्रात ग्रामिण जीवनोन्नती अभियान प्रभावीपणे राबविले जात आहे. सन २०१२-१३ मध्ये महाराष्ट्रात एकूण ५६७७ स्वयंसहाय्यता गटांची स्थापना करण्यात आली. ज्यामध्ये एकूण ६०,८०१ स्वयंरोजगारी सदस्यांचा समावेश होता. यास्वयंरोजगारींना सन २०१२-१३ मध्ये ७२.१९ को.रू. अनुदान व २०७.९९ को.रू. कर्ज पुरविण्यात आले. सन २०१३-१४ ला एकूण ९०२४ स्वयंसहाय्यता गटांची स्थापना केली गेली. ज्यामध्ये एकूण १,०२,७८९ स्वयंरोजगारी समाविष्ट होते व त्यांना एकूण ४०५.६९ कोटी रू. कर्ज उपलब्ध करून दिले गेले. तर इ.स. २०१४-१५ वर्ष अखेर ४६,०४८ स्वयंसहाय्यतागटांची स्थापना झाली. ज्यामध्ये एकूण १२,७१,८०८ सदस्य होते. या सर्व स्वयंरोजगारींना ५३.६९ को.रू. अनुदान व ५२७.७८ को.रू. पतपुरवठा केला गेला.

सन २०१५-१६ मध्ये डिसेंबर अखेर ८२,८१७ स्वयंसहाय्यता गटांची स्थापना झाली. त्यात १५,७३,५६७ सदस्य होते. त्यांना १४.९१ को.रू. अनुदान व २९४.४५ को.रू. इतका कर्जपुरवठा केला गेला.

**संदर्भसूची**


१. मुलाणी एम.यु., 'महिला स्वयं सहाय्यता बचतगट', प्रथमावृत्ती २०१२, डायमंड पब्लीकेशन, पुणे.

२. 'राष्ट्रीय ग्रामिण आजीविका मिशन (कार्यान्वयन का स्वरूप)', २०१३, ग्रामिण विकास मंत्रालय, भारत सरकार, नई दिल्ली.

३. नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन - 'महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०१४-१५', अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई.

४. 'अर्थसंवाद' - मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक, ऑक्टोबर-डिसेंबर २०१६, खंड ४०, अंक ३.

५. विविध संकेतस्थळे व दैनिक वर्तमानपत्रे




Scanned with OKEN Scanner

Impact Factor – 6.261 Special Issue - 146 B Feb. 2019 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

UGC Approved Journal

Multidisciplinary International E-research Journal

# RECENT TRENDS IN SOCIAL SCIENCES

Organized by

N. T. V. S's

**G. T. Patil Arts, Commerce and Science College,**

NANDURBAR, Dist. Nandurbar - 425 412 (Maharashtra)




■ GUEST EDITOR ■

**Dr. Madhulika Sonawane**

■ EXECUTIVE EDITOR ■

**Prof. Dr. Narendra B. Gosavi**

■ CHIEF EDITOR ■

**Dr. Dhanraj T. Dhangar**

RESEARCH JOURNEY

**This Journal is Indexed in :**

- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- Universal Impact Factor (UIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictionary of Research Journal Index (DRJI)

**For Details Visit To : www.researchjourney.net**

SWATIDHAN PUBLICATIONS

Scanned with OKEN Scanner

| | | |
|---|---|---|
| 20 | **Study of Impact of Buyback on Earning Per Share of the Company**<br>Nitin Prakash Jain, Dr. Dilip Rambhau Jagtap | 059 |
| 21 | **Green Marketing in India - An Overview**<br>Prof. Ravindra Laxminarayan Totale | 061 |
| २२ | **मेक इन इंडिया : उत्पादन के क्षेत्र में संभावनाएँ एवं चुनौतियाँ**<br>डॉ. सचिन दुबे | ०६४ |
| २३ | **वैश्विक स्तर पर हिंदी कास्थान एवं भूमिका**<br>प्रा.डॉ. राजेंद्र बाविस्कर | ०६६ |
| २४ | **स्वच्छ भारत अभियान इन्दौर बना परिवर्तन का पर्याय बदलाव प्रबंधन की एक उन्नति मिशल**<br>श्वेता जोशी, डॉ. अशोक वर्मा | ०६९ |
| २५ | **वैश्वीकरण और हिंदी**<br>डॉ. गोकुलदास सोनु ठाकरे | ०७१ |
| २६ | **निश्चलनीकरण : वास्तव आणि परिणाम**<br>प्रा.डॉ. अरुण उखा पाटील | ०७३ |
| २७ | **कोकणा – कोकणी समाजाचा कौटुंबिक व वैवाहिक जीवनाचा इतिहास**<br>प्रा. डॉ. डी.डी. राठोड | ०७५ |
| २८ | **नंदुरबार जिल्ह्यातील ग्राहकांच्या वर्तणूकीवर परिणाम करणाऱ्या विपणनातील आधुनिक प्रणालींचे (E-Commerce) अध्ययन**<br>प्रा. गावित दिपक दामू, प्रा. डॉ. डी. आर. जगताप | ०७७ |
| २९ | **ई–कॉमर्स : एक दृष्टीक्षेप**<br>प्रा.डॉ. टी.ए. मोरे | ०७९ |
| ३० | **प्रत्यक्ष कृषी विपणनातील (शेतकरी – बाजारपेठ) ऊझावर संथाईची भूमिका व मूल्यमापन**<br>प्रा.डॉ. के.बी. गिरासे | ०८२ |
| ३१ | **ख्रिस्ती धर्माचा प्रसारात व्यापारी मार्गाची भूमिका : एक चिकित्सक अभ्यास**<br>वळवी विश्वास गोरखनाथ | ०८४ |
| ३२ | **वस्तू व सेवा कराच्या माध्यमातून सामाजिक जबाबदारी संदर्भातील प्रभावी परिणाम / निष्पत्ती**<br>प्रा. डॉ.पी. के. पाटील | ०८६ |
| ३३ | **ग्राहक संरक्षण कायदा, १९८६**<br>प्रोफेसर एम. एम. मून | ०८८ |
| ३४ | **भारतीय वित्तीय व्यवस्थेत नवीन सुरुवात जी.एस.टी.**<br>प्रा. दिपक भगवान वरसाळे, प्रा. डॉ. डी. आर. जगताप | ०९१ |
| ३५ | **भारतीय अर्थव्यवस्थेत जी.एस.टी. ची वाटचाल आणि परिणाम**<br>प्रा.डॉ. वायसे शामराव भगवान | ०९३ |
| ३६ | **नोटबंदी एक ऐतिहासिक निर्णय**<br>प्रा. कांतिलाल डी. सोनवणे | ०९६ |
| ३७ | **विपणन व्यवस्थापन**<br>प्रा. नाईक पी. एन. | १०० |
| ३८ | **भारतातील विमुद्रीकरण : वास्तव, आव्हाने व परिणामांचे चिकित्सक अध्ययन**<br>डॉ. डी. आर. जगताप, डॉ. बापु बाबुराव मंगळे | १०२ |
| ३९ | **बँकामधील नव–तंत्रज्ञान : ई–बँकींग**<br>प्रा. डॉ. अविनाश रामलाल निकम | १०४ |
| ४० | **नोटबंदीचे परिणाम**<br>डॉ. ताराचंद माधव सावसाकडे | १०७ |




Scanned with OKEN Scanner

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261
Special Issue 146 B : RECENT TRENDS IN SOCIAL SCIENCES
ISSN : 2348-7143
Feb. 2019

# निश्चलनीकरण : वास्तव आणि परिणाम

प्रा.डॉ. अरुण उखा पाटील
कला व वाणिज्य महाविद्यालय, अक्कलकुवा जि.नंदुरबार

८ नोव्हेंबर २०१६ च्या रू. ५०० आणि रू. १००० च्या चलनातील नोटा रद्द करण्याच्या निर्णयाचे वर्णन सर्वत्र या इंग्रजी शब्दाने करण्यात आले. त्याचे सुलभ मराठीकरण 'निश्चलनीकरण', 'नोटाबंदी' या शब्दांनी करण्यात आले. या पार्श्वभूमीवर विचार करता, प्रचलीत चलनी विशिष्ट नाणी किंवा विशिष्ट कागदी चलन विशिष्ट परिस्थितीत उदा. युद्ध पश्चात, टोकाची भाववाढ इ. परिस्थितीत प्रस्थापित कायद्याप्रमाणे रद्द करणे म्हणजे 'निश्चलनीकरण' होय. या धोरणाला 'रोकडरहीत अर्थ व्यवहार किंवा अर्थव्यवस्था' असेही म्हटले जाते. देशात निश्चलनीकरण धोरण स्वीकारण्यामागील उद्दिष्टांच्या सर्वंकष अपयशानंतर हाती आलेल्या माहितीनूसार हे स्पष्ट होते की, निश्चलनीकरणाचा निर्णय लोकशाही प्रक्रीयेस बाजुला सारून घेण्यात आला आहे. केवळ राजकीय मंडळींनाच नव्हे तर अर्थतज्ञांनाही विश्वासात घेतले गेले नाही. यावर जोरदार हल्ला चढविल्यानंतर यास बगल देण्याच्या हेतूने व रोकड चलनाची भारतात असलेली टंचाई दूर करण्याच्या उद्देशाने रोकडरहित अर्थव्यवहारांची चर्चा देशात सुरू करण्यात आली. या संदर्भात काही प्रमाणात बंधनकारक अंमलबजावणी करण्याचे ठरविल्यामुळे साहजिकच याविषयी सकारात्मक व नकारात्मक चर्चा संपूर्ण देशभर सुरू झाली. या पार्श्वभूमीवर रोकडरहित अर्थव्यवहार धोरणाचा तटस्थपणे अभ्यास करण्याच्या उद्देशाने प्रस्तुत विषयाची निवड करण्यात आली.

**अध्ययनाची उद्दिष्ट्ये**

१) रोकडरहित अर्थव्यवहाराच्या प्रभावाचा अभ्यास करणे.
२) प्रत्यक्ष निर्णय, वास्तव व्यवहार आणि दिशाभूल करणारा प्रचार यातील सहसंबंध तपासणे.

**तथ्य संकलन**

प्रस्तुत शोधनिबंध लेखनासाठी दुय्यम साधन सामग्रीचा आधार घेण्यात आला आहे. यात प्रामुख्याने संदर्भ ग्रंथ, वृत्तपत्रे, मासिके याबरोबरच विविध संकेतस्थळांचाहीवापर करण्यात आला आहे. प्रस्तुत शोध निबंधासाठी प्रत्यक्ष निरीक्षणाचाही उपयोग झालेला आहे.

**रोकडरहित अर्थव्यवहाराचे फायदे**

१) गुन्हेगारी प्रवृत्तीला आळा बसण्यास मदत होते.
२) रोख पैसा जवळ बाळगण्यातीलीजोखिम कमी होण्यास मदत होते.
३) व्यवहारातील गतिशिलता वाढीस लागते.
४) पारदर्शक आणि उत्तरदायी व्यवहारांना चालना मिळते.
५) कर चुकवेगिरीला आळा बसतो.
६) भ्रष्टाचारावर नियंत्रण प्रस्थापित करता येते.

वरील स्वरूपाचे फायदे रोकडरहित अर्थव्यवहारांचे होत असले तरी या व्यवस्थेमुळे झालेले काही गंभिर परिणाम व काही होणारे परिणाम याचाही विचार करणे आवश्यक आहे. त्यामुळे याधोरणाची अंमलबजावणीकरीत असतांना सर्वसामान्य नागरिकांना बसणाऱ्या फटक्याची तिव्रता काहीप्रमाणात कमी करण्यास मदत होईल.

**रोकडरहित अर्थव्यवहारांचे परिणाम**

१) **सायबर गुन्ह्यांमध्ये होणारी वाढ** – या पद्धतीच्या व्यवहारांमुळे सायबर गुन्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. खातेदारांच्या खात्यावरील रक्कम परस्पर पळविल्याचे अनेक उदाहरणे 'इंडियन एक्सप्रेस'च्या संकेतस्थळावर आकडेवारीसह दिसून येतात. अशा तक्रारी दाखल करूनही दिर्घकाळपर्यंत त्यातून काहीही निष्पन्न होत नसल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे संबंधित खातेदारांना मानसिक तणावाला सामोरे जावे लागत आहे. त्यातून अनेक नवनविन समस्या उद्भवत आहेत.

२) **संगणक साक्षरतेचा अभाव** – भारत हा खेड्यांचा देश म्हणून ओळखला जातो. सन २०११ च्या जनगणनेनुसार देशात ६ लाख ४० हजार ८६७ इतकी खेडी आहेत. या खेड्यांमधून देशातील एकूण लोकसंख्येच्या ६८.८४ टक्के इतकी लोकसंख्या वास्तव्य करते. ग्रामीण भागात अजूनही आवश्यक तेवढ्या सोयी-सुविधा पोहोचलेल्या नाहीत. अनेक खेड्यांमध्ये अजूनही पूर्ण वेळ वीज पुरवठ्याची सोय नाही. देशात ३५० दशलक्ष लोक इंटरनेट वापरकर्ते असून हे प्रमाण एकूण लोकसंख्येच्या २७ टक्के इतकेच आहे. केनिया, नायजेरीया यासारख्या देशात हे प्रमाण ६७ टक्के आहे. भारतात स्मार्ट फोन वापराचे प्रमाण १७ टक्केच आहे. त्यातील फक्त १५ टक्के भारतीय इंटरनेटचा वापर करतात. इंटरनेट वेगाच्या बाबतीत भारत ११४ व्या क्रमांकावर आहे. आजही भारतातील ७६ टक्के लोकांना इंटरनेटच्या वापराविषयी फारशी माहिती नाही. यावरून देशातील नागरिकांच्या एकूण आर्थिक परिस्थितीची कल्पना येते. परिणामी रोकडरहित अर्थव्यवस्था राबवित असतांना कोणकोणत्या अडचणींचा सामना करावा लागत आहे व लागणार आहे याविषयीचाअंदाज येऊ शकतो.

३) **ग्राहकांवर (खातेदारांवर) अतिरिक्त बोजा** – एप्रिल २०१७ पासून भारताच्या मध्यवर्ती बँकेने डेबीट व क्रेडीट कार्ड वापरावर कॅश हॅंडलींग चार्ज, सेवा चार्ज व अधिभार लावण्याचे धोरण आखले आहे. त्यामुळे ग्राहकांवर अतिरिक्त बोजा पडत आहे. शिवाय रोकडरहित अर्थव्यवहाराचीप्रक्रीया पूर्णत्वास जाण्यासाठी किमान अपेक्षा अशी आहे की, हा व्यवहार करू इच्छिणाऱ्यांचे बँकेत खाते असणे अत्यावश्यक आहे व खात्यावर शिल्लक असणे ही दुसरी अट आहे. वित्तीय साक्षरतेचादेशात मोठ्या प्रमाणावर अभाव असल्यामुळे या सर्वच गोष्टींचे ज्ञान सामान्य ग्राहकांना असेलच असे नाही. त्यामुळे आपणांस आधी वित्तीय साक्षरता निर्माण करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे आवश्यक आहे.

४) **भ्रष्टाचारास आळा घालण्यात अपयश** – रोकडरहित अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी भ्रष्टाचारावर आळा घालता येईल असा प्रचार सर्वत्र केला जात आहे. परंतु सर्वंकष पातळीवर विचार केल्यास असे दिसते की, भ्रष्टाचार हा भांडवलीव्यवस्थेचे अपरिहार्य अंग आहे. एन.डी. टीव्हीचे संपादक रविश कुमार यांच्या मतानुसार, रोकडरहित होण्यामुळे करचोरी बंद होत नाही. याचे स्पष्टीकरण करतांना ते म्हणतात की,



Scanned with OKEN Scanner

अमेरिकेत दरवर्षी ३० ते ३२ लाख कोटी रूपयांची करचोरी होते. अमेरिकेत इंटरनल रेव्हेन्यु सर्विस आहे आणि एप्रिल २०१५ मध्ये त्यांचा अहवाल आला असून त्यात २००८ ते २०१० या काळात दरवर्षी ४५८ अब्ज डॉलर इतकी करचोरी झाल्याचे नमूद आहे. भारतीय रूपयात ती रक्कम ३०-३२ लाख को.रू. आहे. हाआकडा या अर्थाने महत्त्वाचा आहे की, भारतातील निश्चलनीकरणानंतर रोकडरहित व्यवहाराचा अशा पद्धतीने प्रचार केला जात आहे की, जणू ते करचुकवेगिरी रोखण्याचे एकमेव उत्तर आहे. परंतु रोकडरहित व्यवहार सर्रासपणे चालणाऱ्या अमेरिकेत करचुवेगिरी कुठे कमी न होता सुरूच आहे. 'आंतरराष्ट्रीय कंपनी कर सुधारणा कमिशन'च्या २०१५ च्या अहवालात असे म्हटले आहे की, बहुराष्ट्रीय कंपन्या इतक्या मोठ्या प्रमाणावर करचोरी करतात की, त्याचा भार शेवटी सामान्य करदात्यांवर पडतो.

या पार्श्वभूमीवर विचार केला तर असे दिसून येते की, आपल्या देशातील आर्थिक विकासाचा दृष्टीकोन, प्रयोजन व नियंत्रण अशा स्वरूपाचे आहे की भ्रष्टाचार हा एकूण अर्थव्यवस्थेत 'बाय प्रॉडक्ट' सारखा तयार होतो.

थोडक्यात आपणास स्पष्टपणे म्हणता येईल की, भ्रष्टाचार हा रोग नसून ते रोगाचे लक्षण आहे आणि बोकाळलेली भांडवलशाही हारोग आहे. त्यामुळे रोकडरहित अर्थव्यवहारामुळे यास खिळ बसेल किंवा बसली आहे असे म्हणणे एकूणच तत्वाला धरून केलेले विश्लेषण होणार नाही. कारण भ्रष्टाचार हा भांडवलशाही अर्थव्यवस्थेचे अंग आहे.

**निष्कर्ष**

रोकडरहित अर्थव्यवस्थेच्या निर्मितीची कल्पना भारताच्या संदर्भात अपयशी झाल्याचे दिसून येते. अमेरिकेत ४५ टक्के लोक रोकडरहित अर्थव्यवहाराचावापर करतात. आपल्या शेजारील चीन, जे राष्ट्र आज भारतीतलच नव्हे तर एकूणच जगातील अनेक देशांच्या बाजारावर प्रभुत्व गाजवत आहे. त्या ठिकाणी हे प्रमाण केवळ १० टक्के एवढेच आहे. भारतात केवळ २ टक्के लोक रोकडरहित अर्थव्यवहाराचा आधार घेतात. हे वास्तव चित्र आपणांस मान्य करावे लागेल. देशातील लहानात लहान आणि मोठ्यातील मोठा व्यवहार काही अपवाद वगळता आजही व्यापक प्रमाणात रोकड चलनाच्या माध्यमातून होतो. या सर्व बाबींचा खोलवर जाऊन विचार केल्यास असे दिसते की, निश्चलनीकरणाच्या व्यापक पातळीवरील अपयशानंतर सरकार पूर्णतः गोंधळले असून रोकडरहित अर्थव्यवहाराचा बडेजाव करू लागले आहे. ही तरफदारी करतांना जणू रोखीने व्यवहार करणारे नागरीक गुन्हेगार आहेत, आतंकवादीआहेत, करचोर आहेत, अशा पद्धतीची वातावरण निर्मिती केली जात आहे.

थोडक्यात डिजीटल इंडिया, रोकडरहित व्यवहार या संकल्पनांच्या घोषणांचा पाठपुरावा केला जात असला तरी आणि हा विचार चांगला असला तरी देशातील ६ लाख ४० हजार ८६७ गावे मिळून २ लाख बँक शाखा आहेत आणि जवळपास तेवढीच एटीएमची संख्या आहे. त्यातील बऱ्याच शाखा शहरीभागात आहेत. देशातील बहुतेक बँकांमध्ये आजही कालबाह्य ऑपरेटींग सिस्टीम वापरात असल्याचे मत आनंद तेलतुंबडे यांनी व्यक्त केले आहे. देशात ६ कोटी डेबिट कार्ड आणि अडीच कोटी क्रेडीट कार्ड आहेत. देशातील १३४ कोटी जनतेला रोकडरहित व्यवहाराच्या वाटेने घेऊन जाण्यासाठी इतकी पायाभरणी पुरेशी नाही. दुसरे म्हणजे आजही अधिकाधिक व्यवहार रोखीने चालतात. ऑनलाईन खरेदीचे प्रमाण नगण्य आहे. आजही ९५ टक्के श्रमशक्ती असंघटीत क्षेत्रात कार्यरत आहे. त्यांचे सर्वच व्यवहार रोखीने चालतात. देशातील वास्तव चित्र समजण्यासाठी ही आकडेवारी पुरेशी आहे. म्हणून रोकडरहित अर्थव्यवस्थेचा विचार करीत असतांना प्रथम आपला देश अगोदर समजून घेतला पाहिजे. कारण सदर व्यवस्था लागू करण्यामागे अनेक प्रश्न उपस्थित केले जाऊ शकतात आणि ते केले गेले पाहिजेत. कारण योग्य प्रश्नांमध्येच त्यांची उत्तरेही दडलेली असतात. त्यांचा ऊहापोह होणे काळाची गरज आहे. तरच रोकडरहित अर्थव्यवहाराच्या वास्तव स्थितीचे चित्र आणि परिणाम आपल्या समोर येईल, अशी अपेक्षा.

**संदर्भ**

१) चंद विनोद – नोटबंदीचा प्रवास : अपयशापासून अपयशापर्यंत, चित्रलेखा, १३ नोव्हेंबर २०१७.
२) चांदेकर संजीव फिनटके – गरिबांचे मित्र की शत्रू?, परिवर्तनाचा वाटसरू, पुणे १६ ते २८ फेब्रुवारी २०१८.
३) कुमार रविश; कॅशलेस होण्यामुळे करचोरी बंद होत नाही, नोटबंदी – अर्थक्रांती की आर्थिक घोडचुक? संपादक – राम जगताप, डायमंड पब्लीकेशन, पुणे, नोव्हेंबर २०१७.
४) महाराष्ट्र टाइम्स – २४ डिसेंबर २०१७.
५) तेगमपुरे मारोती, नगदरहीत अर्थव्यवहार, महाराष्ट्र टाईम्स, एप्रिल २०१८.
६) तेलतुंबडे आनंद – भारताचा मारी आन्तवानेत क्षण, युगांतर, मुंबई, २ ते ८ मार्च २०१७.
७) अर्थसंवाद, मराठी अर्थशास्त्र परिषद, नियतकालिक (त्रैमासिक), जुलै-सप्टेंबर २०१८.



Scanned with OKEN Scanner